# तरुण भारत

कोल्हापूर

www.tarunbharat.com

+८ ✦ ₹ ३.०० शनिवार दि. ५ जानेवारी २०१३ बेळग


# मायलेकींची कथ्थक नृत्याविष्काराची रंगत



कोल्हापूर : 'शिकागो टू कोल्हापूर' संकल्पनेवर कथ्थक नृत्य सादर करताना गौरी जोग, ईशा जोग.

## गौरी जोग, ईशा जोग यांच्या नृत्याने रसिक मंत्रमुग्ध

▶**कोल्हापूर / प्रतिनिधी**

आई विख्यात कथ्थक नृत्यागंना तर कन्या आईच्या कठोर प्रशिक्षणांतर्गत कथ्थक नृत्यात पारंगत झालेली. दोघेही अमेरिकेतील शिकागोसारख्या महानगरात वास्तव्यास पण जीव मायभूमीत. काही तरी करण्याची उर्मी त्यांना गप्प बसू देईना या उर्मीतूनच शुक्रवारी सायंकाळी कोल्हापूरच्या मातीत 'शिकागो टू कोल्हापूर' हिच संकल्पना डाळयासमोर ठेऊन गौरी जोग व ईशा जोग या मायलेकींचा कथ्थक नृत्याविष्कार सादर झाला.

गायन समाज देवल क्लबच्या पुढाकाराने शुक्रवारी सायंकाळी केशवराव भोसले नाट्यगृहात फ्यूजन संकल्पनेतील हा कथ्थक नृत्याविष्कार सादर झाला. फ्यूजनच्या वेगवेगळया संकल्पनांवर आधारित कथ्थक नृत्याने वेगवेगळे प्रकार आणि बॅले नृत्याने या मायलेकींनी उपस्थितांना थक्क करून सोडले. कथ्थक नृत्याचे वेगवेगळे प्रकारांचे सादरीकरण त्यानी केले. कु. शर्वरी जोग हिच्या समर्पक सुत्रसंचानाने या कार्यक्रमात रंग भरला. गायन समाज देवल क्लबचे उपाध्यक्ष दिलीप गुणे, कार्यवाह श्रीकांत डिग्रजकर, अरुण डोंगरे यांच्या उपस्थितीत या कार्यक्रमाचा शुभारंभ झाला. संयोजन नितीन जोग, संजय जोग यांनी केले.